**वादीचा शपथेवर पुढील जादा सरतपास सुरु–**
**वादीतर्फे विधिज्ञ श्री. बी. पी. शेटकर –**

मी प्रस्तुत कामी मला सुभाष कासकर याने दिलेली नोटीस हजर केलेली आहे. त्यांचेतर्फे वकील सुभाष देसाई यांनी शोभा दत्ताराम गावडे यांना नोटीस दिली होती. सदरची नोटीस ही सन १९७६ पासून भाडे थकीत असलेबाबत नमूद होते. सदर नोटीस विधिज्ञ सुभाष देसाई यांची सही आहे. ते माठेवाडा येथे राहणारे आहेत. त्यांची सही मी ओळखतो. त्यांची सही मी माझे विधिज्ञ असल्याने ओळखतो. ते सध्या मयत आहेत. सदरची नोटीस मला दाखविलेस मी ओळखू शकतो. (वादीने सदर प्रतीबाबत दुय्यम पुरावा सादर केला आहे.) आता साक्षीदारास नि.३३/१ कडील नोटीस दाखविण्यात आली. साक्षीदार सांगतो की ती तीच नोटीस आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदरचा पुरावा हा दुय्यम पुराव्याने दाखल केलेला असल्याने त्यास **नि.५२** देण्यात येते.

त्यानंतर सुभाष वामन कासकर यांनी माझ्या ताब्यात दिलेली नोटीस मी प्रस्तुत कामी हजर केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. (वादीने सदर प्रतीबाबत दुय्यम पुरावा सादर केला आहे.) आता साक्षीदारास नि.३३/२ कडील नोटीस दाखविण्यात आली. सदरची नोटीस सुभाष याने दत्ताराम गावडे व किर्ती गावडे यांना दिलेली आहे. ते शोभा गावडे यांचे वारस आहेत. सदर नोटीसवर कासकर यांची सही आहे. त्यांची सही मी ओळखतो. त्याची सही ओळखण्याचे कारण म्हणजे ते माझ्या बाजूला रहात होते व मी त्यांना पूर्वीपासून ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदरचा पुरावा हा दुय्यम पुराव्याने दाखल केलेला असल्याने त्यास **नि.५३** देण्यात येते. सदर नोटीस पोहोच झालेबाबतची पोहोच पावती मी दाखल केलेली आहे. सदरची नोटीस नि.३३/३ लगत आहे. सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **नि.५४** देण्यात आली.

सुभाष गावडे यांनी मला दिलेली नोटीस मी प्रस्तुत कामी हजर केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ओळखू शकतो. आता साक्षीदारास नि.३३/४ कडील नोटीसची प्रत दाखविण्यात आली. साक्षीदार सांगतो की तीच आहे. सदरची नोटीस माझ्या नांवे आहे. त्यास

**नि.५५** देण्यात येते. सदर नोटीसीस मी माझे विधिज्ञांमार्फत उत्तर दिलेले आहे. सदर उत्तराची कार्यालयीन प्रत मी प्रस्तुत कामी हजर केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ओळखू शकतो. आता साक्षीदारास नि.३३/५ कडील प्रत दाखविण्यात आली. साक्षीदार सांगतो की, ती तीच आहे. त्यावर विधिज्ञ सुभाष सावंत यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.५६** देण्यात आली. सदर नोटीस पोहोच झालेबाबतची पोहोच पावती मी दाखल केलेली आहे. सदरची नोटीस नि.३३/६ लगत आहे. सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **नि.५७** देण्यात आली.

जादा सरतपास पूर्ण.

उलटतपासाकरीता पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत.

KUMBHAR RANJANA GOVIND

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.07.31 11:58:44 +0530

(श्रीमती आर.जी.कुंभार)

दि.२३/०७/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.